# वसई-विरार शहर महानगरपालिका
## वैद्यकीय आरोग्य विभाग

दि.१६/०२/२०२२

**<u>प्रेसनोट</u>**

केंद्र शासनाच्या सूचनांना अनुसरून राज्यामध्ये व त्या अनुषंगाने वसई विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रात कोव्हीड-१९ प्रतिबंधक लसीकरण मोहीम राबविण्यात येत आहे.

दि.१६ फेब्रुवारी, २०२२ महानगरपालिकेला २६०० **'कोवॅक्सीन'** लसीचे डोस प्राप्त झाले असून महानगरपालिकेच्या सर्व नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये सदरील डोसचे समप्रमाणात वाटप करण्यात आले आहे. प्राप्त **'कोवॅक्सीन'** लसीचे डोस हे प्राधान्याने इयत्ता १० वी व १२ वी बोर्डाच्या परीक्षेला बसलेल्या विद्यार्थांना देण्यात येणार असून त्याबाबतच्या सूचना नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील वैद्यकीय अधिकारी व जीएनएम यांना देण्यात आलेल्या आहेत.

नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी व जीएनएम यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या शाळा व महाविद्यालयांशी संपर्क करून परीक्षेस बसलेल्या (१० वी / १२ वी/इतर) विद्यार्थ्यांसाठी विशेष लसीकरणाचे नियोजन करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

**वैद्यकीय आरोग्य विभाग**
**वसई विरार शहर महानगरपालिका**